


महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २२ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०९० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये


लक्षवेधी

## २७ गावांची संघर्ष समिती निवडणूक आयोगात जाणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवलीतील २७ गावांचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर आता सर्वपक्षीय हक्क सरंक्षण संघर्ष समिती राज्य निवडणूक आयोगाची भेट घेणार आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला २७ गावांच्या सर्व पक्षीय हक्क समितीने विरोध आहे. केडीएमसीने जाहीर केलेल्या प्रारूप प्रभाग रचने संदर्भात ३६४२ हरकती २७ गावातून दाखल झाल्या आहेत. जाणीवपूर्वक या हरकती व २७गावातील जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केडीएमसीच्या माध्यमातून केला जात असल्याचा आरोप २७गावांच्या सर्व पक्षीय हक्क समितीने केला आहे. समितीचे अध्यक्ष खासदार सुरेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष सत्यवान म्हात्रे, सुमित वझे, मधुकर माळी, रतन पाटील, रामचंद्र पाटील इतर सर्व संघर्ष समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते. सर्वोच्च न्यायालयाने २७ गावांची याचिका दाखल करून घेतली आहे. तर आता २७ गावांच्या सर्व पक्षीय हक्क समितीने राज्य निवडणूक आयोगाची वेळ मागितली आहे. २७ गाव सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीचे अध्यक्ष खासदार सुरेश म्हात्रे यांच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. दाखल केलेल्या याचिकेबाबत तारखा जवळ येत असून आता न्यायालयाने सर्व प्रतिवादींना आप आपले म्हणणे मांडण्याकरिता वेळ दिलेली आहे. प्रकरणातील सर्व प्रतिवादींना नोटिस बजावण्याचे काम सर्वोच्च न्यायालयाकडून सुरू झाले आहे. तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेवर ३६४२ हरकती २७ गावातून दाखल करण्यात आल्या होत्या. या हरकती जाणीवपूर्वक व २७ गावातील जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केडीएमसी मार्फत केला गेला आहे, असा आरोप समितीकडून होतोय.

२७ गाव संघर्ष समिती, सर्व पक्षीय नेतेमंडळी तसेच ११ सप्टेंबरला केडीएमसी मुख्यालय येथे उपस्थित सर्व जनतेचा विजय झाला, त्याचे कारण म्हणजे आता या भ्रष्ट केडीएमसीनेच २७गावातून प्राप्त हरकतींची संख्या ही ३३८७ इतकी असल्याचे अधिकृत पत्रान्वये घोषित केले आहे. असं सर्वपक्षीय हक्क हक्क समितीने काढलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# आजपासून देशात जीएसटीचे नवे दर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली**

नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी केंद्र सरकारने जनतेसाठी GST कर दरात बदल केले आहेत. GST परिषदेच्या बैठकीत विविध वस्तूंवरील करदरात कपात करण्यात आली असून, हा बदल उद्या म्हणजेच २२ सप्टेंबर पासून लागू होत आहे. त्यामुळे दैनंदिन जीवनातील अनेक वस्तू स्वस्त होणार आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवरात्रीच्या पूर्वसंध्येला नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्म्स आणि स्वदेशी या दोन गोष्टींवर देशातील जनतेला मार्गदर्शन केलं. गरीब आणि नवमध्यमवर्गाला दिलासा देण्याचा प्रयत्न असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. वन नेशन वन टॅक्सचं स्वप्न जीएसटीमुळं साकार झालं. सुधारणा ही निरंतर सुरु असणारी




प्रक्रिया आहे. सर्व राज्यांना सोबत घेत स्वतंत्र भारतातील सर्वात मोठी कर सुधारणा केल्याचं सांयामुळं देश डझनभर करांच्या जाळ्यातून बदल झाला, असं मोदी म्हणाले.

### आता फक्त 5 % आणि 18 % जीएसटी स्लॅब

आता फक्त 5 टक्के आणि 18 टक्क्यांचा जीएसटी स्लॅब अनेक जीवनावश्यक वस्तू होणार स्वस्त ज्या वस्तूंवर आधी 12 टक्के टॅक्स होता, त्यावर आता 5 टक्के टॅक्स जीएसटी कमी झाल्यामुळे घर, टीव्ही, फ्रीज, कार, बाईक, स्वस्त होणार हॉटेल्स प्रवासावर जीएसटी कमी केला नागरिक देवो भव: हा मंत्र घेऊन आम्ही पुढे जात आहोत इन्कम टॅक्समध्ये सूट आणि जीएसटी रिफॉर्ममुळे अडीच लाखांची बचत ज्या वस्तू देशात तयार करता येतात, त्या देशातच तयार व्हाव्यात लघु, सूक्ष्म, कुटीर उद्योगांकडून मोठी अपेक्षा आहे आपण जे तयार करु, त्याची क्वालिटी जगात गौरव वाढवणारी असावी, असं यावेळी मोदी यांनी म्हटलं आहे. या पार्श्वभूमीवर मोदी यांनी दिलेला आत्मनिर्भर भारताचा नारा महत्त्वाचा आहे, त्यांनी यावेळी बोलताना जनतेला स्वदेशी वस्तूच खरेदी करण्याचं आवाहन केलं आहे

# वाहतूककोंडीमुळे जिल्हा प्रशासन हतबल

## तिसरी अधिसूचना जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात दररोज होणाऱ्या तीव्र वाहतूककोंडीमुळे प्रशासन हतबल झाले असून, अवजड वाहनांच्या हालचालीबाबत एक नव्हे तर तिसरी अधिसूचना काढण्यात आली आहे. यापूर्वीचे दोन निर्णय रद्द करून नव्या आदेशानुसार आता सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत दहा चाकी व त्यापेक्षा जड ट्रकांना प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ठाणे तसेच घोडबंदर मार्गावरील कोंडी

> कसारा, शहापूर, वासिंद, भिवंडी तसेच आवश्यक ठिकाणी अवजड वाहनांसाठी थांबण्याची व्यवस्था करावी. नवी मुंबई व पालघर जिल्ह्यात होल्डिंग प्लॉट्स निश्चित करावेत. महामार्ग सुरक्षा पोलीस, प्रादेशिक परिवहन अधिकारी, एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आदी विभागांनी समन्वय साधून रस्ते सुस्थितीत ठेवावेत. ठाणे जिल्ह्यातील तीन पोलीस आयुक्तालयांसह लगतच्या विभागांनी एकत्रितपणे वाहतूक नियंत्रण उपाययोजना आखाव्यात, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. ● डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हाधिकारी

सोडवण्यासाठी पहाटे ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत अवजड वाहनांना प्रवेशबंदी लागू केली होती. परंतु, या निर्णयामुळे ठाणे ग्रामीण, मीरा-भाईंदर, वसई-विरार आणि पालघर जिल्ह्यात कोंडी वाढली. दोन वर्षांच्या बालिकेचा जीव वाहतूककोंडीमुळे गमावल्याच्या घटनेनंतर संताप व्यक्त होताच जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आधीचा बदल रद्द करून नवा आदेश दिला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीची बैठक घेऊन घोडबंदर रस्त्यावर रात्री बारानंतरच अवजड वाहने सोडण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर ठाणे वाहतूक पोलिसांनी रात्री १२ ते पहाटे ६ या वेळेतच परवानगी दिली. या व्यवस्थेमुळे घोडबंदर मार्गावरील कोंडी कमी झाली, मात्र इतर भागात समस्या वाढल्याने तिसरी अधिसूचना काढण्यात आली.



# आज ठाणे मेट्रोची चाचणी !

## मेट्रोच्या चाचणीसाठी मुख्यमंत्री ठाण्यात ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील वाहतुक कोंडीतून ठाणेकरांची सुटका व्हावी यासाठी मेट्रो प्रकल्पांची कामे सध्या सुरु आहेत. यातील मेट्रो चार प्रकल्प (वडाळा-घाटकोपर-कासारवडवली) आणि चार अ (कासारवडवली ते गायमुख) मार्गिकच्या निर्माणाची कामे ठाणे शहरात सुरु आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) सोमवारी या मेट्रोच्या चाचणीचा निर्णय घेतला आहे. मध्य रेल्वे मार्गावरील ठाणे आणि लगतच्या शहरांसाठी हा प्रकल्प अतिशय महत्वाचा असल्यामुळे या चाचणीच्या निमीत्ताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ओवळा माजीवडा विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासह शिंदे शिवसेनेने जोरदार शक्तीप्रदर्शनाची तयारी केल्याचीही चर्चा आहे. असे असले तरी या महत्वाच्या मेट्रो मार्गाच्या चाचणीसाठी घोडबंदरच्या गायमुख पट्ट्यात स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित रहाणार आहेत असे सांगितले जाते. हा प्रकल्प एकनाथ शिंदे यांचा 'ड्रीम प्रोजेक्ट' मानला जात असला तरी या महत्वाच्या टप्प्यावर फडणवीस यांनी उपस्थित रहावे असे स्थानिक भाजप नेत्यांचाही आग्रह आहे.

ठाणे शहरात नागरिकरण वाढल्याने मोठ्याप्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. त्याचा ताण मध्य रेल्वे, शहरातील सार्वजनिक वाहतुकीवर बसत आहे. त्यामुळे ठाण्यातील नोकरदारांना मुंबई गाठता यावी यासाठी एमएमआरडीएकडून मेट्रो चार आणि चार अ प्रकल्पाची निर्मिती केली जात आहे. या प्रकल्पांची कामे सध्या घोडबंदर भागातून सुरु आहे. घोडबंदर भागात पावसामुळे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. मेट्रो मार्गिकच्या निर्माणाची कामे, खड्यांमुळे रस्त्याची झालेली वाईट अवस्था यामुळे घोडबंदर भागातून प्रवास करणाऱ्यांना कोंडीचा सामना सहन करावा लागतो. ऑगस्ट महिन्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मेट्रोची चाचणी सप्टेंबर महिन्यात होणार असल्याची घोषणा केली होती. त्यानंतर एमएमआरडीएकडून हालचालींना वेग आला.

> **ठाणे मेट्रो प्रकल्पाची घोषणा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना झाली होती. या प्रकल्पाची पायाभरणी सोहळाही त्यांच्याच काळात झाला होता. पुढे ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो प्रकल्पाची पायाभरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झाली होती. ठाणे मेट्रो प्रकल्पाची घोषणा झाली तेव्हा एकनाथ शिंदे यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री पद होते. तसेच ठाण्याचे पालकमंत्रीही तेच होते. त्यावेळी ठाण्यात आलेले देवेंद्र फडणवीस यांना शिंदे, तेव्हाचे आमदार प्रताप सरनाईक आणि राजन विचारे यांनी मेट्रोची प्रतिकृती भेट दिली होती. उद्या होणाऱ्या मेट्रो प्रकल्पाच्या चाचणीसाठी त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी ठाण्यात यावे अशी स्थानिक नेत्यांची आग्रही मागणी होती. त्यानुसार देवेंद्र फडणवीस स्वत: या प्रकल्पातील चाचणीसाठी गायमुख भागात उपस्थित रहाणार आहेत अशे समजते. गायमुख ते कॅडबरी जंक्शन स्थानकापर्यंत ही मेट्रो धावेल तेव्हा शिंदे यांच्यासोबत फडणवीसही उपस्थित असतील अशी माहिती सुत्रांनी दिली. यासंबंधीच्या वृत्ताला एमएमआरडीएकडून अधिकृत दुजोरा मात्र मिळालेला नाही.**

# दुर्गाडी नवरात्रोत्सवामुळे कल्याण शहरात दसऱ्यापर्यंत अवजड वाहनांना बंदी

**बदलापूर परिसरातून नेवाळी नाका मार्गे कल्याण शहरात येणाऱ्या जड वाहनांना नेवाळी नाका येथे प्रवेश बंद असेल. ही वाहने बदलापूर, अंबरनाथ महामार्गाने इच्छित स्थळी जातील. उल्हासनगर भागातून श्रीराम चौकातून कल्याणकडे येणाऱ्या जड, अवजड वाहनांना श्रीराम चौकात प्रवेश बंद असेल. ही वाहने श्रीराम चौकातून उल्हासनगर, अंबरनाथ, शहाडमार्गे जातील.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - अनेक वर्षांची परंपरा असलेला ऐतिहासिक कल्याण शहरातील दुर्गाडी किल्ल्यावरील दुर्गाडी देवी नवरात्रोत्सव सोमवार (ता.२२) पासून सुरू होत आहे. दहा दिवस चालणाऱ्या (ता.२) या नवरात्रोत्सवामुळे दुर्गाडी किल्ला परिसरातील रस्ते आणि कल्याण शहर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक विभागाने कल्याण शहरात सोमवारपासून संध्याकाळी चार ते रात्री १२ या वेळेत जड, अवजड वाहनांना प्रवेश बंदी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. हलक्या वाहनांची वाहतूक शहरातून सुरू राहणार आहे.

सोमवारपासून या निर्णयाची कठोर अंमलबजावणी सुरू होईल. जड, अवजड वाहन चालकांनी पर्यायी रस्ते मार्गाने इच्छित स्थळी जावे, असे वाहतूक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाट यांनी अधिसूचनेच्या माध्यमातून जाहीर केले आहे.

**प्रवेश बंद आणि पर्यायी मार्ग**

नवी मुंबई, पनवेल, अलिबाग, पुणे भागातून कल्याण शहरात येणाऱ्या सहा चाकी जड, अवजड वाहनांना मुंब्रा वाहतूक हद्दीतील शिळफाटा दत्तमंदिर चौक (कल्याण फाटा) येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. ही वाहने मुंब्रा खारेगाव जुना टोलनाका, मुंबई नशिक महामार्गान इच्छित स्थळी जातील. तळोजा खोणी बाह्यवळण रस्तामार्गे कल्याण शिळफाटा रस्त्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना काटई बदलापूर रस्त्यावरील खोणीतील निसर्ग ढाबा येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. ही वाहने काटई चौक, पलावा चौक, कल्याण फाटामार्गे इच्छित स्थळी जातील.









# म्हाडाची घरं आणखी स्वस्त होणार !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

म्हाडाची घरं आणखी स्वस्त होणार, नव्या किंमत ऐकून तुम्हीही व्हाल अवाक्घरांच्या किमती कशाप्रकारे कमी होतील, त्याबाबत अभ्यास करून अहवाल तयार करण्यासाठी म्हाडाने उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह तीन जणांची समिती नेमली होती. म्हाडाने घर घरेदी करणाऱ्यांसाठी आणखी एक आनंदाची बातमी दिली आहे. सर्वांनाच परवडणारी घरे हवी असतात. अशात अनेक ठिकाणी घरांच्या किंमती या गगनाला भिडलेल्या आहेत.

अशा वेळी इच्छा असूनही घर घेण्याचं स्वप्न पूर्ण होत नाही. अशा सर्व सामान्य लोकांचे घर घेण्याचे स्वप्न म्हाडाच्या माध्यमातून पूर्ण होवू शकते. त्याला कारण म्हणजे म्हाडाच्या घरांच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे. म्हाडाची सोडत जाहीर झाल्यानंतर घरांच्या किमती जास्त आहेत, अशी तक्रार करण्यात आली होता. त्याचा आता म्हाडाने गांभीर्याने विचार केला आहे. त्यातूनच घराच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे. म्हाडाची घरं महाग आहेत, अशी सर्वसामान्यांकडून केली जाणारी नेहमी तक्रार आहे.

अशा वेळी म्हाडाने घराच्या किमती कशा कमी होतील याचा विचार केला आहे. त्यानुसार घरांच्या किमतीत ज्या अनावश्यक घटकांची भर पडते, त्याला कैची लावण्यासाठी म्हाडाने एक समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल आठवडाभरात म्हाडा प्राधिकरणाला सादर केला जाणार आहे.

या अहवालाच्या अनुषंगाने किमती निश्चित केल्यास म्हाडाच्या घरांच्या किमती तब्बल आठ ते दहा टक्क्यांनी कमी होणार आहे. असं झाल्यात घर घेणं सर्व सामान्यांच्या आवाक्यात येईल.

## वाचक मनोगत

### बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक भगीरथ

# कर्मवीर भाऊराव पाटील

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज जयंती. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्या मनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, ( २७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रोपट्याचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची १३८ वि जयंती. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे.

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड - जिल्हा पुणे




### पहिला दिवस : पहिली माळ

# आजची देवी : श्री शैलपुत्री



नवरात्र हा भारतातील सर्वात महत्वाचा आणि शुभ सण आहे. जगभरातील हा सण साजरा केला जातो. जो दुर्गा देवीच्या नऊ रूपांना समर्पित आहे. नवरात्री हा शब्द संस्कृत भाषेतून आला आहे. नव' म्हणजे 'नऊ' आणि 'रात्री' म्हणजे 'रात्र'. तर नवरात्री देवीची 9 रूपे कोणती आहेत जाणून घ्या. शरद ऋतूत महत्त्वाचे सण म्हणजे नवरात्रोत्सव, दसरा, कोजागिरी पौर्णिमा, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, पाडवा, भाऊबीज... असे येतात. सुरुवात होते आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून, म्हणजे घटस्थापनेपासून. आदिमाया, आदिशक्तीच्या उपासनेचे नऊ दिवस म्हणजे नवरात्रींचा उत्सव. या उत्सवाची रंगत सर्व उत्सवांपेक्षा वेगळी आहे. घरात, मंदिरात, मंडपात दुर्गामातेची प्रतिष्ठापना करतात. या उत्सवाचा संबंध थेट बळिराजाच्या कष्टाशी आहे, कष्टकरी शेतकऱ्यांच्या साध्याभोळ्या संस्कृतीशी आहे. घटस्थापना म्हणजे बीजपरीक्षण! वावरात जी पिकं घेतली जातात, त्यापासून अन्नधान्य मळतं. त्या काळ्या आईच्या उपकारांची जाणीव ठेवणं, कृषिवलांचे ऋण मान्य करणं, कृतज्ञता मानणं, धन्यवाद देणं म्हणून हे नऊ दिवस! नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये आदिशक्ती दुर्गेच्या नऊ रुपांची पूजा केली जाते. ही नऊ रूपे नवदुर्गा म्हणून ओळखली जातात.

नवरात्रीची सुरुवात देवी शैलपुत्रीच्या पूजेने होते ज्याला पर्वताची कन्या म्हणूनही ओळखले जाते कारण संस्कृतमध्ये कन्या म्हणजे ‘पुत्री’ आणि पर्वत म्हणजे ‘शैल’ (शैल+पुत्री = शैलपुत्री). ती नंदी नावाच्या पांढऱ्या बैलावर स्वार होते आणि तिच्या एका हातात त्रिशूल आणि दुसऱ्या हातात कमळ आहे. या दिवशी भक्त देवी शैलपुत्रीला शुद्ध देशी तूप किंवा त्यापासून बनवलेले अन्न अर्पण करतात जेणेकरून त्यांना निरोगी आयुष्याचा आशीर्वाद मिळेल. तिचा आवडता रंग पांढरा आहे. शिव महापुराण आणि इतर हिंदू पौराणिक कथांनुसार, प्रजापती दक्षाची कन्या देवी सतीचा विवाह महादेवाशी झाला होता. परंतु राजा दक्ष या लग्नाला पूर्णपणे अनुकूल नव्हता. एके दिवशी त्याने महायज्ञ आयोजित केला. शिव आणि सती वगळता सर्व देवता आणि जवळच्यांना आमंत्रित करण्यात आले. हे पाहून सतीला खूप वाईट वाटले आणि तिला जाणवले की तिचे वडील फक्त तिच्या पती शिवाचा अपमान करत आहेत. या असह्य परिस्थितीत तिने योगिक यज्ञाच्या अग्नीत जाळलेले शरीर अर्पण केले. हे दृश्य महादेवासाठी अत्यंत वेदनादायक होते. त्याने स्वतःला सर्वांपासून वेगळे केले आणि अनेक युगांची तपश्चर्या केली. त्याच्याशिवाय संपूर्ण विश्व अराजक होते. परंतु, राजा हिमालयाच्या घरी पार्वती नावाच्या सतीचा पुनर्जन्म झाल्याने आशेचे किरण पोळले. तथापि, पार्वतीला तिचे भगवान शिव मिळवणे खूप कठीण होते, कारण महादेव स्वतःला साधनेच्या घनतेत गमावून बसले होते. प्रचंड प्रयत्न आणि अपार भक्तीने, देवी पार्वतीने भगवान शिवाकडे जाण्याचा शोध आणि प्रवास सुरू केला. अनेक प्रयत्नांनंतर, तिला महादेवाशी लग्न करण्याची संधी मिळाली. अशाप्रकारे, शैलपुत्रीने स्वतःला मूळ चक्राची खरी देवी म्हणून प्रतीक म्हणून ओळखले. तिचे जागरण भगवान शिवाशी वैश्विक प्रेम स्थापित करण्यासाठी होते जे तिला जागृतीची देवी म्हणून गौरवते.



# शहापुरात निरंकारी मिशनच्यावतीने मोफत नेत्रचिकित्सा शिबिर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** संत निरंकारी मिशनच्या डोंबिवली झोन अंतर्गत शहापूर शाखा आणि के.बी.हाजी बच्चूअली चॅरिटेबल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने संत निरंकारी सत्संग भवन, गोठेघर, शहापूर या आदिवासी भागात मागील रविवारी मोफत नेत्रतपासणी शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात २८७ जणांची नेत्रतपासणी करण्यात आली. त्यात ३२ मोतीबिंदूचे रुग्ण आढळले, या रुग्णांना के बी हाजी बच्चूअली चॅरिटेबल हॉस्पिटल येथे मोफत शस्त्रक्रियेसाठी नेण्यात आले. त्यापैकी आतापर्यंत १० जणांवर शस्त्रक्रिया करण्यात आली.

या व्यतिरिक्त १०८ व्यक्तींना चष्मे वाटण्यात आले तर उर्वरित नेत्ररुग्णांना मोफत औषधोपचार देऊन डोळ्यांची निगा राखण्यासाठी तज्ञ डॉक्टरांकडून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिराला शिवसेना तालुका प्रमुख प्रकाश वेखंडे यांनी सदिच्छा भेट दिली. उपस्थित मान्यवरांनी मिशनच्या मानवतावादी कार्याचे कौतुक केले.

मिशनच्या समाज कल्याण विभागाच्या प्रेमा ओबेरॉय यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. मिशनच्या शहापूर शाखेचे मुखी शैलेश सपकाळे यांच्या देखरेखीखाली सेवादल सदस्यांनी हे शिबीर पार पाडण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

# खरोशी येथील श्री केळंबादेवीच्या नवरात्रोत्सवाचा आजपासून शुभारंभ



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** सालाबादप्रमाणे यावर्षीही पेण तालुक्यातील खरोशी येथील नवसाला पावणारी हाकेला धावणारी लाखो भाविकांचं श्रद्धास्थान असणा-या शाश्वत दैवत स्वयंभू श्री केळंबादेवीचा नवरात्र उत्सव सोमवार दिनांक २२/०९/२०२५ ते बुधवार दिनांक ०१/१०/२०२५ रोजी साजरा करण्यात येत आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये लाखो भाविक माऊलीच्या दर्शनाचा लाभ घेत असतात. खरोशी ग्रामस्थ मोठ्या आतुरतेने आणि आनंदमय वातावरणामध्ये या केळंबा देवीच्या नवरात्र उत्सवाची वाट पाहत असतात. आलेल्या भाविकांना मनोभावे दर्शन मिळावे त्याचबरोबर त्यांना प्रसाद चहापान व्यवस्था व्यवस्थित रित्या करणे यासाठी गावकरी बंधू सेवेसाठी तत्पर असतात या दहा दिवसाच्या कालावधीमध्ये देखील अशाच प्रकारची सेवा ग्रामस्थ मंडळ करणार असल्याची माहिती देण्यात आली. घटस्थापनेच्या पहिल्या दिवशी देवीच्या माहेरघरांमधून वाजत गाजत गुलाल बुक्का उधळत सायंकाळी चार देवीची पालखी मोठ्या वाजत गाजत काढले जाते सायंकाळी देवीच्या मुख्य गाभाऱ्यामध्ये माऊलीचा सांज शृंगार करून भजन म्हणत गावकरी बंधू मोठ्या उत्साहाच्या वातावरणामध्ये सामील झालेले पहावयास मिळतात. अनेक भाविक या देवीच्या मंदिरामध्ये नऊ दिवस मुक्कामी राहतात. शेवटच्या दिवशी एक ऑक्टोबर रोजी दुपारी तीन ते रात्री नऊ वाजेपर्यंत देवीच्या मुख्य मंदिरातून पालखी सोहळा निघून वाजत गाजत गुलाल बुक्का उधळत पुन्हा एकदा देवीच्या गाभाऱ्यामध्ये पालखी आणली जाते आणि याच दिवशी तीर्थप्रसाद आणि महाप्रसादाचा लाभ हजारो भावी घेत असतात यानिमित्त शेवटच्या दिवशी खास कार्यक्रम म्हणून गावातीलच सर्व भजन मंडळींना आमंत्रित करून भजनाचे कार्यक्रम आयोजित केले आहेतआयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी व रसिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा ही ग्रामस्थ मंडळ खरोशी यांनी आवाहन केले आहे.

# भिवंडीत वोटचोरीविरोधात काँग्रेसची स्वाक्षरी मोहीम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडीत युवक काँग्रेसच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष राहुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी (ता. २०) 'वोट चोर गद्दी छोड' या बॅनरखाली काँग्रेस कार्यालयासमोर स्वाक्षरी मोहीम राबवली. या वेळी निदर्शन करून भाजपचा निषेध व्यक्त करण्यात आला. नागरिकांमध्ये जनजागृती होण्यासाठी काँग्रेसचे नेतृत्व राहुल गांधी यांच्या आदेशाने ही आंदोलन देशभर सुरू राहणार आहे, अशी माहिती शहर जिल्हाध्यक्ष राहुल पाटील यांनी दिली. युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष राहुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात युवक काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश सचिव आफरीन शेख, काँग्रेसचे आर्शी आजमी, काँग्रेस माजी नगरसेवक सिद्धेश्वर कामूर्ती, सह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# साईनाथ गावंड यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पेण(. प्रतिनिधी) इंटरनॅशनल जिल्हा अंतर्गत उरण तालुक्यातील उत्कृष्ट शिक्षकांचा २० सप्टेंबर २०२५ उरण नगरपरिषद शाळा क्र.१व२ येथे शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबरोबरच सामाजिक योगदानाने समाज प्रबोधनाचे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.



उत्कृष्ट शिक्षक पुरस्कारासाठी उरण तालुक्यातील जे.एम. म्हात्रे प्राथमिक शाळा मोरा येथील साईनाथ रामदास गावंड यांची निवड करण्यात आली.

शाळेमध्ये उत्तम काम करत असताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणांमध्ये प्रगती व्हावी तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळावं म्हणून सेवा संयोग फाउंडेशन मुंबई यांच्याशी संपर्क साधला. व सतत संस्थेकडून १५ वर्ष विद्यार्थ्यांसाठी दप्तर, वह्या, पुस्तके, कंपास बॉक्स, चित्रकला वही अशा प्रकारचे साहित्य दरवर्षी त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत राहिले. तसेच भारतीय स्टेट बँक उरण यांच्याकडून २०११-१२ यावर्षी शाळेसाठी एक एक्वागार्ड व संगणक मिळवून घेतला. तसेच दहागाव परिसरामध्ये देखील बँकेकडून एक्वागार्ड मिळवून सर्व पूर्व भागातील शाळांना वाटप करण्याचे सहकार्य केले.तसेच सेवा संयोग फाउंडेशन कडून १२ लाख किमतीचे सोलर पॅनल शाळेसाठी बसवून घेतले. तसेच विद्यार्थ्यांसाठी सेवा सेवक फाउंडेशन कडून प्रयोगशाळा बनवून घेतली.

दरवर्षी पहिली ते दहावी प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना वडिलांच्या नावाने बक्षीस देतात.तसेच अनेक शाळांना देखील अशाप्रकारे ठेव ठेवून बक्षीसांचे वाटप केले.आमचे वडिल रामदास गवत्या गावंड कला, क्रीडा, सामाजिक संस्था आवरे यांच्या माध्यमातून पूर्व विभागातील सर्व शाळांना शैक्षणिक साहित्य दरवर्षी वाटप करत असतात. तसेच विविध शाळांना स्पीकर देखील देण्यात आलेलं आहे. गेली पाच वर्षे रायगड जिल्हा खाजगी कर्मचारी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून उत्तम काम पाहत आहेत. तसेच विद्यार्थ्यांचे वेगवेगळे उपक्रम घेऊन त्यांना उपक्रमशील बनवत असतात. शैक्षणिक व सामाजिक बांधिलकी जपत सर्व गोष्टींचा विचार करून साईनाथ रामदास गावंड यांना लायन्स इंटरनॅशनल क्लब यांच्यावतीने उरण नगरपालिका प्रशासन अधिकारी सौ. संगीता माने प्रशासन यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले याप्रसंगी लाईन्स क्लब ऑफ उरणचे MJF लायन्स संजीव सूर्यवंशी जिल्हा प्रांतपाल यांनी आपले मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रम प्रसंगी लायन नीलिमा नारखेडे जिल्हा सभापती शिक्षक गौरव समारंभ यांनी आपल्या मार्गदर्शनपर शब्दांमध्ये MJF संजीव सूर्यवंशी जिल्हा प्रांतपाळ यांच्या कार्याबद्दल माहिती दिली व लायन्स इंटरनॅशनल क्लब बद्दल माहिती सांगितली. MJF लायन डॉ. साहेबराव ओहोळ अध्यक्ष लायन्स क्लब ऑफ उरण यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रम प्रसंगी लाईन्स इंटरनॅशनल क्लब ऑफ उरणचे MJF संजीव सूर्यवंशी जिल्हा प्रांतपाल, MJF लायन चंद्रकांत ठक्कर, MJF लायन सदानंद गायकवाड, लायन नीलिमा नारखेडे जिल्हा सभापती, लायन ज्ञानेश्वर कोठावदे,MJF लायन दीपक पाटील, लायन अंशू पाल, MJF लाईन डॉक्टर साहेबराव ओहोळ, प्रवक्ता आशिष कुमार केदार, व सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षक वर्ग उपस्थित होते.

# डोंबिवलीचे लोकप्रिय आमदार रवींद्र चव्हाण यांचा वाढदिवस जल्लोषात संपन्न





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

*डोंबिवली :: शरद शहाणे*

भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, डोंबिवलीचे लोकप्रिय आमदार, माननीय श्री रवींद्र चव्हाण यांचा 55वा वाढदिवस मोठ्या जल्लोषात संपन्न झाला यावेळी या वाढदिवसानिमित्त शहरात अनेक ठिकाणी विविध लोक उपयोगी कार्यक्रम कार्यकर्त्यांनी आयोजित केले होते.

आपल्या आवडत्या नेत्याच्या वाढदिवसानिमित्त (कल्याण ग्रामीण) तोरणा सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, आणि रिसर्च सेंटर नेरूळ नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन एडवोकेट मंदार गोविंद टावरे माजी नगरसेवक यांनी महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले होते . भारतीय जनता पार्टी कार्यालय, स्वामी विवेकानंद शाळेजवळ आयरे रोड डोंबिवली पूर्व येथे या आरोग्य शिबिरात संपूर्ण तपासणी सर्व रोगांवर औषधोपचार यांची मोफत व्यवस्था करण्यात आली होती सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत चालणाऱ्या या आरोग्य शिबिरात चा शेकडो (रुग्णांनी) नागरिकांनी लाभ घेतला.

या आरोग्य शिबिरात माजी मंत्री जगन्नाथ पाटील, गोविंद शेठ तावरे, निलेश म्हात्रे माजी नगरसेवक, शशिकांत कांबळे महाराष्ट्र प्रदेश अनुसूचित जाती जमाती प्रदेश रवी कार्यकर्ते, महिला आघाडी च्या अध्यक्षा सौ गीता केणे भारती आंबेकर सरचिटणीस अक्षता चव्हाण मंडळ उपाध्या चित्रा माने पूजा भानुशाली वॉर्ड अध्यक्षा उपस्थित होत्या.

या शिबिराला भेट देण्यासाठी आणि सर्व कार्यकर्त्यांना शाबाश ची छाप देण्यासाठी भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण साहेब यांनी भेट दिली तेव्हा कार्यकर्त्यांनी आपल्या लाडक्या आवर त्या नेत्याला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा दिल्या महिला अध्यक्षा गीता केणे यांनी औक्षण आणि मंदार टावरे यांनी शाल श्रीफळ पुष्पक्ष देऊन स्वागत केले.

## भविष्यवेध



सोमवार
२२ सप्टेंबर २०२५

**मेष**
अधिकचा पैसा स्थावर जंगम मालमत्तेत गुंतवा. कुटुंब-मुले आणि मित्रमंडळी यांच्यासमवेत वेळ घालवाल, दान करावे.

**वृषभ**
तुमच्या मनाला पुन्हा एकदा उभारी मिळेल. व्यक्तिमत्व सुधारण्यावर केलेल्या प्रयत्नांचे फळ मिळेल. चिंता, वाद यातून मुक्त रहाल

**मिथुन**
जीवनसाथी सोबत एक कँडल लाइट डिनर सप्ताहाच्या थकव्याला दूर करेल. मित्रांसोबत गप्पा होतील. पर्यटनाला जाल.

**कर्क**
सतत फोनवर गप्पा मारणे डोकेदुखी होण्याची शक्यता आहे. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करणारा दिवस.

**सिंह**
अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील. भाऊ गरजेच्या वेळी उत्तम पाठिंबा देऊ करेल.

**कन्या**
तुमचे आवडते छंद जोपासण्यासाठी किंवा तुमच्या आवडीच्या गोष्टींचा आनंद लुटण्यासाठी वेळ खर्च करा. पुजेत वेळ द्या.

**तुळ**
काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो. घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. द्रव्यलाभाचे अपेक्षित योग येतील.

**वृश्चिक**
धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. मंदिरात जाऊन पुजाअर्चा कराल.

**धनु**
जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना आज स्वतःसाठी वेळ मिळू शकतो. आवांतर वाचनात भर द्यावी.

**मकर**
वादविवाद किंवा कार्यालयातील राजकारण, तुम्ही या सगळ्याला पुरून उराल. चिंता करुन दिवस जाईल. कामं व्यस्त ठेवतील.

**कुंभ**
चांगल्या स्पा मध्ये जाऊन तुम्हाला ताजेतवाने वाटू शकते. यश हातातोंडाशी येण्याची शक्यता. मित्रांपासून लाभ होणार.

**मिन**
आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल. निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे नैराश्य येईल. वाद टाळा.



# भिवंडीत दोन लाख रुपये किमंतीचा दहा किलो गांजा जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( प्रतिनिधी )** भिवंडी शहरातील शांतीनगर कल्याण रोड परिसरातील भादवड न्यू पाईपलाईन या भागात वरिष्ठ पोलीस निरीक्षक

विनायक गायकवाड यांच्या आदेशानुसार पोलिस गस्त करीत असताना मिळालेल्या माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईत एका संशयितास ताब्यात घेऊन त्याच्या सुटकेसच्या तपासणीमध्ये त्याच्या जवळ सुमारे दोन लाख रुपये किमतीचा दहा किलो गांजा जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून संशयित इसमास अटक केली आहे. बाबु कृष्णा निरेटी (म्हाडा कॉलनी,सायन धारावी, मुंबई ) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

शहरातील शांतीनगर पोलिस ठाण्याचे हद्दीत ठाणे पोलीस आयुक्तांचे आदेशानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस सहाय्यक पोलिस निरीक्षक सुरेश



चोपडे,पोलिस कर्मचारी राजेश पाटील,रिझवान सैय्यद,प्रशांत बर्वे,रोशन जाधव,भुषण पाटील,नाजीम शेख,निलेश पाटील

हे पोलीस पथक गस्त घालीत असताना कल्याण रोड भादवड न्यू पाईपलाईन येथे एक संशयित व्यक्ती गांजा हा अमली पदार्थ बॅगेत घेवुन उभा असल्याची खबर पोलिसांना मिळाली. त्यामुळे पोलीस पथकाने भादवड नाका ते शांतीनगरकडे जाणाऱ्या न्यु पाईपलाईन रस्त्याकडे धाव घेऊन सदर ठिकाणी एक व्यक्ती हातामध्ये एक सुटकेस बॅग घेवुन संशयीतरित्या उभा असलेला दिसुन आला.त्यामुळे त्यांच्या संशयास्पद हालचाली वाटल्याने सदर पोलिस पथकाने शिताफीने त्यास ताब्यात घेऊन पंचांसमक्ष त्याची झडती घेतली असता त्याचे ताब्यात असलेल्या राखाडी रंगाची सुटकेस बॅग मध्ये दहा किलो ३९६ ग्रॅम वजनाचा दोन लाख ५ हजार रुपये ५०० रुपये किमतीचा दहा पाकिटात असलेला गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला.त्यामुळे पोलिसांनी गांजा व त्याचा मोबाईल व रोख रक्कम जप्त करून त्या विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे करीत आहेत.

# वसई विरारमध्ये वाळूमाफियांना अभय?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसई विरार मध्ये विविध ठिकाणी वाळू माफियांमार्फत बेकायदेशीर मार्गाने वाळू उपसा सुरूच आहे. नुकताच महसूल विभागाने विरार जवळील कसराळी शिरगाव येथील बंदरात धाड टाकून कारवाई केली आहे. यात १० बोटी व ४ संक्शन पंप उध्वस्त केले आहेत. वसई विरार मध्ये विविध ठिकाणच्या खाडी पात्रात बेकायदेशीर पणे सक्शन पंपाच्या साहाय्याने वाळू उपसा केला जाऊ लागला आहे. विशेषतः वैतरणा खाडी, शिरगाव, जुली बेट, खानिवडे, पाचूबंदर या भागात छुप्या मार्गाने वाळू उपसा होत असतो. याचा मोठा परिणाम पर्यावरण यासह बाजूच्या किनारपट्टीला बसू लागला आहे.

अशा वाळू उपसा रोखण्यासाठी शासन स्तरांवर विविध सामाजिक संघटना यांनी अनेकदा तक्रारी सुद्धा केल्या आहेत. तर २०१४ साली नारंगी येथील शेतकरी संघटनेने उच्च न्यायालयात याचिका दाखल करून ही गंभीर बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर त्यावर वेळोवेळी कारवाई करण्याचे आदेश ही महसूल विभागाला देण्यात आले आहेत. मात्र वेळोवेळी कारवाई करूनही छुप्या मार्गाने वाळू उपसा करण्याचे प्रकार सुरूच आहेत.

नुकताच विरारच्या कसराळी शिरगाव कारगिल येथील भागात महसूल विभागाच्या पथकाने धाड टाकली होती. यात मोठ्या प्रमाणात वाळू उपसा करण्यात आल्याचे दिसून आले. यावेळी वाळूने भरलेल्या दहा बोटी वाळूसह खाडीत बुडविण्यात आल्या. ४ संक्शन पंप साखर टाकून नष्ट करण्यात आले तसेच ४ वाळूच्या कुंड्या अशी १५० ब्रास वाळू जेसीबीच्या सहाय्याने खाडीत टाकून दिली. ही कारवाई तहसीलदार डॉ अविनाश कोष्टी यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी नायब तहसीलदार राजाराम देवकाते, मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या पथकाने केली आहे.

# ११ वीसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची अंतिम फेरी

### २५ सप्टेंबरपर्यंत विद्यार्थ्यांना थेट महाविद्यालयांमध्ये प्रवेशाची संधी




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** शैक्षणिक सत्र 2025-26 साठी इयत्ता ११ वीच्या प्रवेश प्रक्रियेची अंतिम फेरी ऑनलाईन पद्धतीने राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. राज्यातील २१ लाखांहून अधिक प्रवेश क्षमतेपैकी आतापर्यंत १३ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित झाला आहे. उर्वरित जागांसाठी विद्यार्थ्यांना आणखी एकदा प्रवेश घेण्याची संधी मिळणार आहे. राज्यातील एकूण प्रवेश क्षमता २१,५९,२३२ इतकी आहे. यावर्षी १४,८५,६८६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, त्यापैकी 13,43,969 विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग-१ (नोंदणी) व भाग-२ (कनिष्ठ महाविद्यालयीन पसंती सूची) पूर्ण केला आहे. या विद्यार्थ्यांपैकी १३,३३,८९३ विद्यार्थ्यांचे कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित झाले आहेत. तरीही काही कारणास्तव प्रवेश न घेणाऱ्या जागा रिक्त राहिल्यामुळे अंतिम फेरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता सुरू होईल. २४ सप्टेंबर रोजी दुपारी ५ वाजेपर्यंत प्रक्रिया पार पडेल. अल्पसंख्याक, व्यवस्थापन व इतर राखीव कोट्यांतील प्रवेशही याच कालावधीत होतील. तसेच विद्यार्थी २५ सप्टेंबरपर्यंत थेट महाविद्यालयात जाऊनही प्रवेश घेऊ शकतील. प्रवेश प्रक्रियेदरम्यान लॉग-इन करून स्वतःची माहिती तपासणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आणि निश्चित कनिष्ठ महाविद्यालयात वेळेत जाऊन प्रवेश घेणे आवश्यक आहे. कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच प्रवेश अंतिम समजला जाणार आहे. एकदा महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास तो अंतिम राहील. वेळेत प्रवेश न घेतल्यास नंतर कोणतीही संधी उपलब्ध होणार नाही. तरी पात्र विद्यार्थ्यांनी वेळेत प्रवेश घ्यावा असे आवाहन कार्यकारी अधिकारी मनोज रानडे आणि शिक्षणाधिकारी माध्यमिक अशोक पाटील आणि यांनी केले आहे.

# मुंबई मनपाच्या मुदत ठेवी 80 हजार कोटींवर !

### सात महिन्यांत हजार कोटींची घट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : एकेकाळी ९० हजार कोटींच्या पुढे गेलेल्या मुंबई महापालिकेच्या मुदत ठेवी आता तब्बल ८० हजार कोटींवर आल्या आहेत. मुदत ठेवींचा वापर मोठ्या प्रमाणावर विकासकामांसाठी केला जात असून गेल्या दोन अडीच वर्षात मुदत ठेवी कमी होऊ लागल्या आहेत. प्रशासनाने ४ फेब्रुवारी रोजी मुंबई महापालिकेच्या चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात सादर केला. त्यावेळी पालिकेच्या मुदत ठेवी ८१ हजार कोटींवर होत्या. गेल्या सात महिन्यांत त्या ८० हजार कोटींवर आल्या आहेत. पालिकेने गेल्या दोन - तीन वर्षांत मोठमोठे पायाभूत सुविधांचे प्रकल्प हाती घेतले असून या प्रकल्पांची कामे पुढील दोन ते पाच वर्षे चालणार आहेत. त्यात रस्त्यांची काँक्रीटीकरणाची कामे, रस्ते, पूल, वर्सोवा दहिसर सागरी किनारा मार्ग आणि दहिसर भाईंदर जोड रस्ता, गोरेगाव -मुलुंड जोड रस्ता अशा विविध प्रकल्पांमुळे पालिकेला तब्बल दोन ते अडीच लाख कोटींचे दायित्व आहे.



# पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियान संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा दि. २१ (प्रतिनिधी)**

भिवंडी तालुक्यातील पडघा येथे "स्वस्थ नारी, सशक्त परिवार"अभियान २०२५ अंतर्गत पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात विवीध मान्यवरांच्या उपस्थितीत आरोग्य शिबीर उत्साहात संपन्न झाले. राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडून "स्वस्थ नारी सशक्त परिवार" अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत सुरु असुन त्या अंतर्गत आरोग्य विभाग जिल्हा परिषद ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात विविध तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थीतीत शनिवारी महीलांसाठी आरोग्य शिबीर घेण्यात आले यावेळी उपस्थित पडघा ग्रामपंचायतीचे उपसरपंच मयुरेश गंधे व जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या हस्ते द्वीप प्रज्वलन करून आरोग्य शिबीराची सुरुवात करण्यात आली. यावेळी जिल्हा रूग्णालय ठाणे येथील, स्त्रीरोग, बालरोग, दंतरोग तज्ञ यांच्यामार्फत गरोदर माता, बालकांची, महीलांची तसेच दंत, मधुमेह, तोंडाचा कर्करोग, ऍनिमिया, क्षयरोग, सिकल सेल आजाराबाबत तपासणी करण्यात आली व लसीकरण, आभा आयुष्मान कार्ड, आहार व स्वच्छता बाबत उपस्थीत महीलांना तज्ञ डॉक्टरांकडून माहीती देऊन मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी २०० लाभार्थी महीलांनी या शिबीराचा लाभ घेतला.

# कल्याण डोंबिवलीतील रहिवाशांची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करा

### - उपमुख्यामंत्री एकनाथ शिंदे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** कल्याण - डोंबिवलीतील ६५ अनधिकृत इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांची फसवणूक करणाऱ्या विकासक आणि संलग्न सर्व व्यवहारांचा तपास करून यातील सर्वांवर कारवाई करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. नागरिकांची फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासाठी पालिकेने आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे तक्रार करून गुन्हे दाखल करावे, असे निर्देश शिंदे यांनी कल्याण डोंबिवली मनपा आयुक्तांना दिले.

कल्याण - डोंबिवली महापालिका क्षेत्रातील ६५ इमारती उच्च न्यायालयाने अनधिकृत ठरविण्यात आल्या आहेत. यातील रहिवाशांची संबंधीत विकासकाकडून फसवणूक झाली असल्याने आज हजारो कुटुंब बेघर होण्याच्या छायेत आहेत. तर न्यायालयाकडून या इमारती निष्कासित करण्याचे आदेश देण्यात आले आहे. मात्र असे झाल्यास काही हजार कुटुंब बेघर होतील. याच पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात शुक्रवारी विशेष बैठक पार पडली.

अनधिकृत प्रकरणातील नागरिकांना न्यायलायीन निर्णयाच्या अधीन राहून कशा पद्धतीने दिलासा देता येईल याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच या बांधकाम प्रकरणात नागरिकांची फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासाठी पालिकेने आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे तक्रार करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावे असे निर्देश यावेळी शिंदे यांनी दिले.

# टीईटी परीक्षा शिक्षकांसाठी एक अवघड आव्हान!

### टीईटी परीक्षेसंदर्भात भाजपा शिक्षक आघाडीचे प्रशासनाकडे साकडे!

*****

### टीईटी ग्रस्त सेवाज्येष्ठ शिक्षकांना न्याय द्या भाजपा शिक्षक आघाडीची मागणी टीईटी परीक्षेमुळे शिक्षकांमध्ये मानसिक तानतनाव



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे /प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे इ.1 ली ते 8 वी वर्गांवर नियुक्ती करण्यासाठी शिक्षकांना टीईटी परीक्षा अनिवार्य देणं बंधनकारक आहे. टीईटी परीक्षा अनिवार्यता संदर्भात मा. सर्वोच्च निर्णया विरुद्ध पुनर्विचार याचिका दाखल करणे आणि एनसीटीईची टीईटी-2010 अवैध व असैवधानिक अधिसूचना रद्द करणे वा अधिसूचनेत सुधारणा करणेसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजितजी पवार आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांना सदरचे गंभीर समस्येवर लिखित निवेदनाद्वारे मार्ग व तोडगा काढणेसाठी भाजपा शिक्षक आघाडीने आग्रह धरला आहे. त्याचप्रमाणे कोकण पदवीधर मतदार संघांचे आमदार निरंजनजी डावखरे आणि कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी पाठपुरावा करावा आणि मार्गदर्शन करावे म्हणून भाजपा शिक्षक आघाडी आग्रही आहे.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदे(NCTE) ने दि.23 ऑगस्ट 2010 च्या अधिसूचनेनुसार शिक्षण हक्क (आरटीई) कायदा-2009 च्या कलम 23(1) नुसार दि. 29 जुलै, 2011 पासून ई.1 ली ते ई. 8 वी पर्यंतच्या वर्गासाठी शिक्षक नियुक्ती करतांना किमान शैक्षणिक पात्रता व टीईटी परीक्षा उत्तीर्णतेची अट अनिवार्य अर्थात बंधनकारक केलेली आहे. महाराष्ट्रात टीईटीची अधिसूचना दि. 13 फेब्रुवारी, 2013 रोजी जाहीर आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी 2016 पासून लागु आहे. शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टल प्रणाली 2017 पासून सुरु आहे. वेगवेगळ्या अधिसूचना व वेगवेगळे अद्यादेश तमाम शिक्षकांच्या मनात गोंधळ आणि संभ्रम निर्माण करणारे आहेत. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र. 1385/2025 व इतर याचिका संदर्भात दि. 01 सप्टेंबर, 2025 च्या 110 पानी निर्णयानुसार अशासकीय व अशासकीय अनुदानित शाळासाठी दि.29.07.2011 नंतरच्या नियुक्त सर्व शिक्षकांना TET परीक्षा उत्तीर्णतेची अट अनिवार्य केलेली आहे. संविधानातील अनुच्छेद 142 नुसार असाधारण परिस्थितीत पुर्ण न्यायदान करणेसाठी सर्वोच्च न्यायालयास प्राप्त विशेषाधिकाराचा वापर करुन मानवीय दृष्टिकोनातून दि.29.07.2011 पुर्वी नियुक्त किंवा 5 वर्षा पेक्षा कमी सेवा असलेल्या शिक्षकांना TET परीक्षेतून सूट दिलेली आहे. पण 6 वी व 8 वी च्या गट साठी पदोन्नती हवी असेल तर TET परीक्षा उत्तीर्णतेची अट कायम आहे. परंतु या निकालापूर्वी पदोन्नती मिळाली असेल तर गरज नाही आणि 5 वर्षा पेक्षा अधिक सेवाकाल शिल्लक असलेल्या सर्व शिक्षकांना सेवेत असतांना दोन वर्षात अर्थात 24 महिन्यात TET परीक्षा उत्तीर्ण होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा नियमानुसार सेवानिवृत्तीचे लाभ घेऊन सक्तीने राजीनामा देऊन पदमुक्त किंवा सेवामुक्त व्हावे लागेल.

सर्वोच्च न्यायालयाच्या दि. 01 सप्टेंबर, 2025 टीईटी बंधनकारक असल्या बाबतच्या निर्णया विरुद्ध महाराष्ट्रातून अंजुमन हिसारे तालीम ट्रस्ट विरुद्ध महाराष्ट्र राज्य अशी पुनर्विचार याचिका दि. 16 सप्टेंबर, 2025 रोजी सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महाराष्ट्रात किमान 70% अर्थात 3 लाखाहून अधिक व एकट्या ठाणे जिल्ह्यात 22,538 शिक्षकांना सेवेत कायम टिकून राहण्यासाठी व पदोन्नतीसाठी TET परीक्षा द्यावी लागणार आहे. सेवानिवृत्तीमुळे शाळामधील कमालीची घटलेली शिक्षक संख्या,2012 पासून संथगतीने सुरु असलेली शिक्षक भरती प्रक्रिया,शैक्षणिक व अशैक्षणिक कामांचा वाढता बोझा,ऑफलाईन व ऑनलाईन कामाचा अतिरिक्त ताण,अध्ययन - अध्यापनासाठी उपलब्ध असणारी अल्पवेळ आणि 20-25 वर्षाच्या प्रदीर्घ अनुभवानंतर पुन्हा परीक्षा देण्याचं मानसिक दडपण, दहशत व दबाव याचा विचार करता TET परीक्षेची तयारी करणं आणि ती उत्तीर्ण होणं अडचणीचं ठरणार आहे. त्यामुळे शिक्षकाने आपली गुणवत्ता व दर्जा आधीच सिद्ध केलेला असतो मग आत्ताच टी ई टी परीक्षेचा अट्टाहास का? फार्स का?...! असा सवाल आता या निमित्ताने उपस्थित होत आहे.

# आमदार कथोरेंना नगराध्यक्ष संतोष चौधरी यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा!

## मुरबाडमधील राजकीय चर्चांना उधाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड : दिलीप पवार**

मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांचा 19 सप्टेंबर 2025 रोजी 69 वा वाढदिवस त्यांच्या बदलापूर येथील निवासस्थानी धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. या अगोदर 17 सप्टेंबर रोजी रिपाई आठवले पक्षाने व मुरबाड शहरातील नागरिकांनी कुणबी समाज हॉल मध्ये ही वाढदिवसाचे औचित्य जंगी वाढदिवसाचा कार्यक्रम आयोजित केला होता. ज्या नागरिकांना या काळात शुभेच्छा देण्यासाठी जाता न आल्याने त्यांनी 19 सप्टेंबर रोजी बदलापूर येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, आमदार कुमार आयलानी, आमदार सुलभा गायकवाड,आमदार




निरंजन डावखरे, जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष निलेश सांबरे यांनी देखील उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. याच दरम्यान मुरबाड नगरपंचायतचे विद्यमान नगराध्यक्ष ज्यांनी नुकतीच भारतीय जनता पक्षाला सोडचिठ्ठी देत परिवर्तन पॅनल गट स्थापन करून भाजपला सत्तेतून बेदखल केले. परंतु संतोष चौधरी यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने सपत्नीक आमदार किसन कथोरे यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. या भेटीमुळे नगराध्यक्ष संतोष चौधरी यांनी पुन्हा घर वापसी केल्याची चर्चा मुरबाड मध्ये सुरू झाल्या, मात्र वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित राहणे म्हणजे पक्ष प्रवेश नाही अशी स्पष्ट भूमिका मांडत आपण परिवर्तन पॅनलचे एकमेव सदस्य असून सध्या मी तटस्थ असल्याचे जाहीर केले आहे.

मुरबाड नगरपंचायत मधील सत्ता नाट्यात भारतीय जनता पक्षाला सोडचिठ्ठी देत सात नगरसेवक व दोन अपक्ष यांनी परिवर्तन पॅनल स्थापन करून मुरबाड नगरपंचायत वर परिवर्तन पॅनलची सत्ता आणली यापैकी आठ सदस्यांनी नुकताच शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला याला विरोध होत असताना नगराध्यक्ष संतोष चौधरी यांनी तटस्थ राहत आपली भूमिका ठाम ठेवत परिवर्तन मध्ये गडबड झाल्याचे दाखवून दिले मात्र याच दरम्यान आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसाला हजेरी लावून शुभेच्छा दिल्याने संतोष चौधरी यांनी पुन्हा पक्षात प्रवेश केला अशी चर्चा सुरू झाली त्यामुळे संतोष चौधरी यांनी अजून आपण तटस्थ असून मी परिवर्तन पॅनलचा एकमेव सदस्य म्हणून कार्यरत असल्याचे सांगत जेंव्हा मी कुठल्या पक्षात जाईल तेव्हा मी जाहीर करेल सध्यातरी आपण आहे तिथे योग्य असून लोकप्रतिनिधींना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी भेटणे म्हणजे गैर नाही किंवा पक्ष प्रवेश नसल्याचे सांगत या चर्चेला पूर्ण विराम दिला आहे.

# मध्यस्थी द्वारे वाद मिटवल्याने वेळ, पैंसा, शक्तीची बचत - न्यायाधीश सुभाष काफरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण(प्रतिनिधी )** कौटुंबिक न्यायालय बेलापूर, तालुका विधी सेवा समिती बेलापूर आणि नवी मुंबई वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने मध्यस्थी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कौटुंबिक न्यायालय, बेलापूर येथील न्यायाधीश सुभाष रंगनाथ काफरे यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात माननीय न्यायाधीश श्री. काफरे यांनी असे प्रतिपादन केले की–"संवादाकडून सुसंवादाकडे जाण्यासाठी मध्यस्थी ही काळाची गरज आहे." त्यांनी पुढे सांगितले की, "कायदेशीर पद्धतीने विवाहबद्ध झालेले पती-पत्नी जेव्हा न्यायालयात येतात, तेव्हा वैवाहिक खटल्यांमध्ये वेळ, पैसा व शक्ती वाया घालवण्याऐवजी सामंजस्याने निर्णय घेणे अधिक श्रेयस्कर ठरते." या प्रसंगी न्यायाधीश ओंकार साने यांनी वाद निर्माण होण्यामागील कारणे तसेच मध्यस्थी प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. न्यायाधीश आर. व्ही. पाटील यांनी वैकल्पिक वाद निवारणाची संकल्पना मांडत मध्यस्थीचे फायदे व तोटे स्पष्ट केले. तर ऍड. कृष्णा ठक्कर यांनी मध्यस्थी प्रक्रियेतील टप्पे स्पष्ट करत असे नमूद केले की, "सर्व विधीज्ञ हे मध्यस्थ (Mediator) नसतात, तसेच समुपदेशन व मध्यस्थी यात स्पष्ट फरक आहे." या प्रसंगी बेलापूर न्यायालयात मध्यस्थ म्हणून कार्यरत असलेल्या विधीज्ञांचा सत्कार न्यायाधीश सुभाष काफरे, न्यायाधीश ओंकार साने, न्यायाधीश आर. व्ही. पाटील, विवाह समुपदेशक भारत काळे आणि ऍड. कृष्णा ठक्कर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऍड.. मनीषा बंडगर यांनी केले, तर आभार प्रदर्शन कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक गणेश हिरवे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार



पाडण्यासाठी कौटुंबिक न्यायालयाचे कर्मचारी तसेच बेलापूर कोर्ट वकील संघटनेचे मोलाचे सहकार्य लाभले.


ठाणे ■ सोमवार
२२ सप्टेंबर २०२५
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# पवित्र पोर्टलवरून उच्च न्यायालयाने शिक्षण विभागाला फटकारले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : योग्य प्रकारे कार्यान्वित नसलेल्या राज्य सरकारच्या पवित्र पोर्टलऐवजी थेट शिक्षण संस्थांनी केलेल्या शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करण्यावरून उच्च न्यायालयाने शनिवारी राज्याच्या शिक्षण विभागाला फटकारले. तसेच, थेट भरती झालेल्या शिक्षकांच्या नियुक्त्या नियमित करण्याचे १००हून अधिक आदेश देऊनही त्याचा काही उपयोग झाला नसल्याची उद्विग्नताही व्यक्त केली. पवित्र पोर्टलचा वापर कसा करायचा याचे धडे खुद्द राज्याच्या महाधिवक्त्यांनी विविध परिसंवादाद्वारे राज्यातील शिक्षण अधिकाऱ्यांना दिले आहेत. तरीही शिक्षण अधिकारी त्याबाबत शिक्षित झालेले नाहीत, असे ताशेरेही न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने ओढले. शिक्षकांच्या नियुक्त्यांना मान्यता देण्यास नकार देणाऱ्या शिक्षण अधिकाऱ्यांचा आदेश रद्द करण्याच्या मागणीसाठी एक शिक्षिका आणि दोन संस्थांनी स्वतंत्र याचिका केल्या आहेत.

पवित्र पोर्टल हे राज्य सरकारच्या शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाचा एक भाग असून जिल्हा परिषद व महानगरपालिका शाळांसाठी ऑनलाइन शिक्षक भरती हाताळण्यासाठी सुरु करण्यात आले आहे. तथापि, हे पोर्टल योग्यप्रकारे कार्यान्वित नाही. तरीही त्याद्वारे नियुक्ती केली नसल्याचे कारण देऊन शिक्षण अधिकाऱ्यांकडून शिक्षकांच्या नियुक्तीला मान्यता दिली जात नसल्याचा आरोप याचिकांमध्ये करण्यात आला आले.

## अखिल महाराष्ट्र वंजारी सेवा समितीच्या वतीने
# 'राज्यस्तरीय कवी संमेलनाचे' आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : वंजारी समाजातील कवींना आपले हक्काचे व्यासपीठ मिळावे याकरिता अखिल महाराष्ट्र वंजारी सेवा समिती कल्याणच्या वतीने रविवार दिनांक ५ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता सार्वजनिक वाचनालय कल्याण येथे पहिले राज्यस्तरीय वंजारी कवी संमेलन आयोजीत करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कवी, गीतकार अरुण म्हात्रे तसेच कवी संमेलनचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध कवी रवींद्र कांगणे, नाशिक हे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते बाल साहित्यकार एकनाथ आव्हाड यांना साहित्यरत्न पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तरी वंजारी समाजातील जास्तीत जास्त कवींनी या कवी संमेलनात सहभाग घ्यावा असे आवाहन अखिल महाराष्ट्र वंजारी सेवा समितीच्या साहित्य शाखेचे अध्यक्ष कवी रमेश आव्हाड यांनी केले आहे.

कवी संमेलनासाठी दि.३० सप्टेंबर पर्यन्त ८१०४५५००८२ या व्हाट्सअप क्रमांकवर आपले पुर्ण नाव व पत्ता, असलेल्या फक्त दोनच स्वालिखित कविता आपले अल्प परिचयासह पाठवून नोंदणी करावयाची आहे. कवी संमेलनात सहभागी प्रत्येक कवीला प्रमाणपत्र देवून सन्मान केला जाईल. अधिक माहितीसाठी या नंबरवर ८७७९८८७५३९ संपर्क साधावा असे आवाहन समितीचे सरचिटणीस अर्जुन डोमाडे यांनी कळविले आहे.

## डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि नवदुर्गा युवा मंडळाच्यावतीने
# डोंबिवलीत रासरंग नवरात्र उत्सव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून साकार झालेला रासरंग – शारदीय नवरात्र उत्सव यावर्षी १० व्या वर्षात पदार्पण करत असून २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत दररोज सायंकाळी डी.एन.सी. रोडवरील शाळेच्या मैदानावर भव्यदिव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. २०१७ पासून डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि श्री नवदुर्गा युवा मंडळ, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने या उत्सवाचे आयोजन होत आहे.

सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्राशी निगडीत उपक्रम राबवणारे हे फाऊंडेशन सर्वसामान्य जनतेसाठी सेवाभावी कार्य करत असून, त्यातील एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे हा रास रंग नवरात्र उत्सव आहे. या नवरात्र उत्सवाचा उद्घाटन सोहळा कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते तसेच कल्याण ग्रामीण विधानसभेचे आमदार राजेश मोरे आणि शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे तसेच अनेक पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत २२ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजता नऊ रंगी फुगे आसमंतात सोडून करण्यात येणार आहे. दररोज रात्री ८:३० वाजता विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या महिलांचा नवदुर्गा पुरस्काराने सन्मानउपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

प्रसिद्ध तबलावादक व संगीतकार नैतिक नागदा यांच्या ऑर्केस्ट्राद्वारे दांडिया-गरबा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. डॉया शारदीय नवरात्र उत्सवात जास्तीत जास्त दुर्गाभक्त, युवक-युवती, महिला आणि गरबा-प्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि श्री नवदुर्गा युवा मंडळ, डोंबिवली यांच्यावतीने पत्रकार परिषदेत करण्यात आले आहे.

# नांदकर-सांगे येथे विद्यार्थ्यांची मोफत रक्तगट तपासणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : माध्यमिक विद्यालय व जिल्हा परिषद शाळा ,नांदकर - सांगे या दोन्ही शाळेचे मिळून 300 मुलांचे मोफत रक्तगट तपासणी शिबीर संपन्न झाले. रेड स्वस्तिक सोसायटी व स्पर्श फॉउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेतील मुलांचे रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

लॅब टेक्निशियन, डॉक्टर, शिक्षक, शाळेतील कर्मचारी व स्वयंसेवकाचे अथक परिश्रम , शिस्तबद्ध नियोजन व टीम वर्क मुळे रक्तगट तपासणी शिबीर संपन्न झाले.

या शिबिरात शाळेतील मुलांना डॉ स्वामी यांनी जेवण करायच्या आधी किंवा हात कश्याप्रकारे स्वच्छ धुवावे याबाबत गोष्टीच्या माध्यमेतून प्रात्यक्षिक करून दाखविले. या शिबीरास रेड स्वस्तिक सोसायटी,स्पर्श फॉउंडेशन,देवी महालक्ष्मी ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट टिटवाळा यांचे सहकार्य लाभले. शिबिरास गावातील निमंत्रक व माजी सरपंच पांडुरंग पाटील व पालक उपस्थित होते.

शिबीर यशस्वी करण्यासाठी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शैलेश सोनावणे, अनुराधा शिंगोळे, भारती जावळे शिक्षक व कर्मचारी वृंद, देवी महालक्ष्मी ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट टिटवाळाच्या मुस्कान खान व लॅब टेक्निशियन, स्पर्श फॉउंडेशन चे अध्यक्ष डॉ पुष्पराज स्वामी तसेच रेड स्वस्तिक सोसायटी,भारत चे सह व्यवस्थापकीय संचालक डॉ प्रमोद नांदगावकर, भास्कर भोईर, कमलेश बोनवटे, मुकुंद नावकर, आनंद लोहार, प्रशांत खजुरे , लखन जगताप यांनी परिश्रम घेतले.

# शासकीय रुग्णालयातील शौचालयात रुग्णाचा मृत्यू?
## प्रशासनावर बेफिकिरीचा आरोप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयातील गंभीर बेफिकिरी पुन्हा एकदा उघड झाली आहे. रुग्णालयाच्या शौचालयात महेश कुकरेजा (४५) या रुग्णाचा मृत्यू झाल्याच्या घटनेने शहरवासीयांमध्ये संताप उसळला आहे. समाजसेविका डॉ. रुपिंदर कौर मुरजानी यांनी स्वतः पाहणी करून ही बाब उघडकीस आणली व आरोग्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी महेश कुकरेजा यांना उपचारासाठी रुग्णालयात आणले असता ड्युटीवरील डॉक्टरांनी त्यांना दाखल करण्यास नकार दिला. डॉ. मुरजानी यांनी हस्तक्षेप केल्यावर त्यांना भरती करून घेण्यात आले. मात्र मंगळवारी त्यांची तब्येत बिघडली असताना ते शौचालयात बेशुद्धावस्थेत रक्ताने माखलेले सापडले. नातेवाईकांच्या आरोपानुसार, त्यावेळी कोणताही डॉक्टर, वार्डबॉय किंवा स्टाफ मदतीसाठी हजर नव्हता, उलट दुसऱ्या रुग्णालयात घेऊन जाण्याचा सल्ला देण्यात आला. या घटनेनंतर शहरातील सामाजिक संघटना आणि नागरिकांनी आरोग्य विभागाने तातडीने हस्तक्षेप करून रुग्णालयातील सुविधा, स्वच्छता व आपत्कालीन सेवा सुधाराव्यात, अशी मागणी केली आहे.

"जीव वाचवण्यासाठी येणारे रुग्ण शौचालयात मृत्यूला का सामोरे जात आहेत?" असा नागरिकांचा सवाल प्रशासनासाठी धक्कादायक ठरला आहे. रुग्णांना ॲडमिट करण्यास टाळाटाळ, तपासण्या वेळेवर न होणे, आपत्कालीन सेवांचा अभाव आणि कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती वार्ड व स्वच्छतेची अत्यंत दयनीय अवस्था असे आरोप रुग्णालयावर होत आहेत.

## 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत
# कल्याण-डोंबिवलीत सखोल स्वच्छता मोहिम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण-डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रात "स्वच्छता ही सेवा अभियान" १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत असून त्याअंतर्गत आज ड प्रभाग परिसरात चक्कीनाका ते बिकानेर बेकरी (मलंग रस्ता) येथे सखोल स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेस मा. आमदार सुलभाताई गणपत गायकवाड, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर, ५/ड प्रभागाचे सहा. आयुक्त उमेश यमगर, मुख्य स्वच्छता अधिकारी ऑगस्टीन घुटे, स्वच्छता



अधिकारी विक्रम गायकवाड, रचना पार्क ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मनोहर देसाई व प्रधान, तसेच ज्येष्ठ नागरिक, चेतना शाळेचे विद्यार्थी, सुमित एल्कोचे IEC पथक, अधिकारी- कर्मचारी व इतर मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. महापालिकेच्या स्वच्छता विभागाने या मोहिमेदरम्यान रस्ते व फुटपाथ काटेकोर स्वच्छता, झाडलोट, कचरा गोळा करून योग्य विल्हेवाट या सर्व बाबींवर विशेष भर दिला. नागरिकांना अधिक स्वच्छ व निरोगी वातावरण मिळावे यासाठी कर्मचारी वर्गाने मनापासून मेहनत घेतली. तसेच नागरिकांमध्ये जनजागृतीसाठी "माझा कचरा माझी जबाबदारी" या संकल्पनेवर आधारित पथनाट्यही सादर करण्यात आले. नागरिकांनी दररोज घंटागाडीत कचरा देणे, व्यावसायिकांनी दुकानात कचरा डबे ठेवणे, रस्त्यावर कचरा न टाकणे याबाबत आवाहन करण्यात आले महापालिका सातत्याने शहरातील रस्ते व गल्लींची स्वच्छता राखण्यासाठी कटिबद्ध आहे. स्वच्छता ही केवळ जबाबदारी नसून सामाजिक बांधिलकी आहे. या अभियानाद्वारे नागरिकांचा सहभाग वाढून स्वच्छ, निरोगी व सुंदर कल्याण-डोंबिवली घडविण्यात निश्चितच यश मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



# जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे संविधानावर आधारित माहितीपट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**टिटवाळा** : जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष श्री रवींद्र घोडविंदे सर यांच्या मार्गदर्शनातून जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालय गोवेली येथे अनुलोम सामाजिक संस्थेच्या माध्यमातून अनुगामी लोकराज्य महाअभियान अंतर्गत संविधानाची पंचाहत्तरी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित केले गेले. याप्रसंगी अनुलोम मित्र व भाजपाचे कल्याण ग्रामिणचे चिटणीस श्री दिनेश दवणे,भाजपा कल्याण ग्रामिणचे उपाध्यक्ष श्री संजय जाधव , अनुलोमचे मुरबाड भाग जनसेवक श्री दिनेश भावार्थे सर, जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री प्रकाश रोहणे सर, शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री दिनेश दवणे यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यानंतर श्री दिनेश भावार्थे सर यांनी भारतीय संविधानाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देऊन संविधानाचे महत्त्व स्पष्ट केले.

यापर्संगी एका माहितीपटाद्वारे विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचा इतिहास आणि महत्त्व सांगण्यात आले .कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना संविधानावर आधारित प्रश्नावली देऊन विद्यार्थ्यांचे अभिप्राय घेण्यात आले. शेवटी श्री नरेश टेंभे सर यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला

# खातिवली : ठाकरे गटाचा कार्यकर्ता मेळावा संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
आसनगांव(प्रतिनिधी)

येथील खातिवली जिल्हा परिषद गटातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षाचा कार्यकर्ता मेळावा व जाहीर पक्ष प्रवेश सोहळा शनिवारी पार पडला. आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक अनुषंगाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सनई लॉन्स, खातिवली येथे झालेल्या या कार्यकर्ता मेळाव्यात शिवसेना तालुका पदाधिकारी दत्ताशेठ ठाकरे व खातिवली-वासिंद सेवा सहकारी संस्था चेअरमन विलास पाटील यांच्या परिश्रमामुळे या गटातील खातिवली येथील सामाजिक कार्यकर्ते चिंतामण वासुदेव जाधव यांच्या पुढाकाराने भाजपा पंचायत समिती माजी सदस्य चेतन जाधव, सामाजिक कार्यकर्त्या सिद्धी जाधव व इतर नवनियुक्त वासिंद ग्रामीण विभाग प्रमुख रघुनाथ मसणे यांच्या पुढाकाराने कातबाव-दहागांव येथील सामाजिक कार्यकर्ते संजय भोर, माजी सरपंच सुरेश पवार व इतर तर खातिवली विभाग प्रमुख अंनता भोईर यांच्या पुढाकाराने वेहलोळी येथील सामाजिक कार्यकर्ते नंदकुमार सोष्टे, भाजप कार्यकर्ते गुरुनाथ बाळू भोईर व इतर असे या विभागातील जवळपास 225 ते 250 राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य व महिला कार्यकर्त्या यांनी शिवसेना (उबाठा) पक्षात प्रवेश केला तर यावेळी पक्षातील काही नव्याने पदभार दिलेले कार्यकर्ते व महिला आघाडी कार्यकर्त्या यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

दरम्यान, पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांना त्रास व आमिष दाखवून प्रवेश घेतले जात आहेत परंतु या पडत्या काळात ज्यांनी शिवसेना सोडली नाही, ते पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे व आदित्यजी ठाकरे यांच्या पाठीशी ठाम उभे राहिले आहेत त्यामुळे कोणी कितीही प्रयत्न केले तरी शिवसेना कमजोर होणार नाही असे ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे यांनी म्हटले. तर ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात तळागाळापर्यंत शिवसेना रुजलेली आहे. येथे तर खिंडार दिसत नाही, शिवसैनिक व कार्यकर्ते भरभरून दिसतात असा टोला जिल्हा ग्रामीण प्रमुख कुंदन पाटील यांनी लगावला तसेच शिवसेनेत जे निष्ठेने आहेत ते कधीही पक्षाविरुद्ध काम करणार नाहीत, त्यातच भाजपचा रडीचा डाव खेळण्याचा खेळ संपणार आहे व इतर खोटे चाललेलं हे राजकारण जास्त दिवस चालणार नाही, शिवसेना हि तुमच्या सारख्या सामान्य शिवसैनिकांच्या जीवावर आहे. तर इथले पक्ष प्रवेश पाहून भारावून गेलेलो आहोत असे विचार शिवसेना उपनेते विश्वास थळे यांनी मांडले. या कार्यक्रमाप्रसंगी शिवसेना उपनेते विश्वास थळे, ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे, ठाणे जिल्हा प्रमुख (ग्रामीण) कुंदन पाटील, उपजिल्हा प्रमुख शंकरजी खाडे, महिला आघाडी जिल्हा संघटक रश्मीताई निमसे, आदिवासी कक्ष जिल्हा प्रमुख जानू हिरवे, तालुका विधानसभा संपर्क प्रमुख मिलिंद देशमुख, तालुका प्रमुख कुलदीप धानके, भिवंडी तालुका प्रमुख करसन ठाकरे, महिला आघाडी तालुका संघटक गुलाब भेरे, माजी सभापती अश्विनी वारघडे, जि.प.माजी सदस्य मोहन जाधव, राजेश विशे, जेष्ठ कार्यकर्ते रंगनाथ काठोळे, नागोशेठ मसणे, तालुका सहसंपर्कप्रमुख दत्ता ठाकरे, सचिव रविंद्र लकडे, उपतालुकाप्रमुख कमलाकर जाधव, निळू खरे, विजय देशमुख, गणेश अवसरे, विलास काबाडी, गुरुनाथ ठाकरे, बाळाराम तरणे, विजय भोंडवे, विकास शेलार, विलास पाटील, रघुनाथ मसणे, मोतीराम ठाकरे, रविंद्र वेखंडे, सचिन महाजन, दत्ता चंदे, चेतन काबाडी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यासाठी शिवसेना शाखा खातिवली तसेच इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवसैनिक यांनी परिश्रम घेतले होते.

# नवी मुंबईत पाण्यासाठी सिडको विरोधात संताप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खारघर** : पाणी द्या नाही तर घरे परत घ्या आणि आमचे पैसे परत द्या, अशा आशयाचे फलक तळोजा सेक्टर २७मधील आसावरी गृहनिर्माण सोसायटीच्या मुख्य प्रवेशद्वारावर झळकत आहेत. चार वर्षांपासून अपुऱ्या पाणीपुरवठ्याला कंटाळलेल्या रहिवाशांनी अखेर सिडकोचा जाहीर निषेध नोंदवला आहे.

आसावरी गृहप्रकल्पात तब्बल ५० इमारती आणि ४,८३५ सदनिका असून, हजारो नागरिक वास्तव्यास आहेत. यंदा मोठ्या प्रमाणात पाऊस होऊनही आणि हेटवणे धरण ओसंडून वाहत असूनही सोसायटीत पाणीटंचाई कायम आहे. नागरिकांना दिवसाआडच पाणी मिळते, तेही अत्यंत अपुरे. त्यामुळे संतप्त रहिवाशांनी निषेधाचे फलक सोसायटीच्या प्रवेशद्वारावर लावून सिडको प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

आसावरी गृहप्रकल्पात तब्बल ५० इमारती आणि ४,८३५ सदनिका असून, हजारो नागरिक वास्तव्यास आहेत.

यंदा मोठ्या प्रमाणात पाऊस होऊनही आणि हेटवणे धरण ओसंडून वाहत असूनही सोसायटीत पाणीटंचाई कायम आहे. नागरिकांना दिवसाआडच पाणी मिळते, तेही अत्यंत अपुरे. त्यामुळे संतप्त रहिवाशांनी निषेधाचे फलक सोसायटीच्या प्रवेशद्वारावर लावून सिडको प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

# खर्डी उपजिल्हा रुग्णालयात 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर,ता.21(वार्ताहर):- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिवसानिमित्त खर्डी उपजिल्हा रुग्णालयात 'स्वस्थ नारी – सशक्त परिवार' या अभियानांतर्गत विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उदघाटन वैद्यकीय अधिक्षक डॉ.आशीलाक शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सरपंच मंगला गावित,रुग्ण कल्याण समितीचे सदस्य शैलेश खर्डीकर,टेंभा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.रमेश राठोड,सामाजिक कार्यकर्ते नरेश जाधव व डॉ.हेमंत काटकर उपस्थित होते. सदर आरोग्य शिबीरा दरम्यान 350 नागरिकांनी आपल्या विविध तपासण्या करून लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ निर्माण अधिकारी आसिफ शेख यांनी केले. यामध्ये महिलांचे आरोग्य, किशोरवयीन मुलींचे समुपदेशन, पोषण जागरूकता, तसेच विविध तपासण्या आणि लसीकरण याबाबत जनजागृती करण्यात आली.

शिबिरामध्ये महिलांना आरोग्य शिक्षण, पोषणविषयक मार्गदर्शन, तसेच किशोरवयीन मुलींसाठी योग प्रशिक्षण आणि समुपदेशन देण्यात आले. या कार्यामध्ये ठाण्याहून आलेल्या डॉक्टर, एक्स-रे टेक्निशियन एस. कांबळे व प्रकाश पाटील (प्रयोगशाळा सेवक) यांनी मार्गदर्शन केले. या शिबिरात पोषण आहार बाबत स्टॉल लावण्यात आला होता ज्यामध्ये विविध फळे, भाज्या आणि अन्नघटकांमधील जीवनसत्त्वांची माहिती चार्टच्या माध्यमातून देण्यात आली. या शिबिरात हिमोग्लोबिन,शिवायटीबी,सिकलसेल, रक्तशर्करा, ब्लड ग्रुप,स्तन, गर्भाशय, मुख, दंतरोग व गरोदर महिलांची प्रसूतीपूर्व तपासणी,झिरो ते १० वर्षे वयोगटातील बालकांचे लसीकरण आदी तपासण्या करण्यात आल्या.

यावेळी डॉ. हेमंत काटकर, डॉ. सलमान शेख, डॉ. सायली मोरे, डॉ. सौरभ घिगे, अधिपरिचारिका संगीता मस्के,अलिशा शेख, प्राजक्ता आढाव, वैभवी वाघ, अनुराधा माळी ,आरती महाडीक, एम.बागुल व आनंद इसापुरे यांनी विशेष मेहनत घेतली.

# भिवंडी मनपातील अत्यावश्यक सेवेतील रिक्त पदे भरण्याची मागणी
## कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचा उपोषणाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
भिवंडी (प्रतिनिधी)

भिवंडी महानगर पालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील अत्यावश्यक सेवेतील रिक्त पदे भरणेबाबत कार्यकारी अभियंता व बांधकाम विभाग यांना दिलेले निर्देश मागे घेण्यात यावे व नियमानुसार काही वर्षापासून प्रलंबित राहिलेल्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती द्यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाने भिवंडी महानगर पालिकेच्या आयुक्त अनमोल सागर यांच्या कडे लेखी निवेदना व्दारे केली आहे. यापूर्वी सुध्दा कामगार संघटनेने महापालिका प्रशासनाकडे मागणी केली होती मात्र त्या कडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे आता या मागणीची गंभीर दाखल न घेतल्यास दि. ३० सप्टेंबर २०२५ पासून आमरण उपोषणास बसणार असल्याची माहिती महाराष्ट्र कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे भिवंडी युनिटचे अध्यक्ष दिपक सखाराम राव यांनी लेखी निवेदनात दिली आहे.

भिवंडी महानगर पालिकेच्या आस्थापने वरील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती पासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. प्रशासनाने वर्ग-४ च्या कर्मचाऱ्याऱ्यांना गेल्या काही वर्षापासून प्रभारी पदाचा कार्यभार सोपवून प्रशासन काम करीत आहे. याबाबत कामगार संघटनेने व महासंघाने अनेक वेळा वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देत नाही तोपर्यंत कोणतीच भरती प्रकीया करुन नये,असे नेहमी पत्रान्वये सुध्दा कळविलेले आहे. मात्र या कडे प्रशासनाने दुर्लक्ष करुन कर्मचाऱ्यांचे शैक्षणिक, आर्थिक व सेवाजेष्ठतेचा विचार न करता कायद्याची पायमल्ली करीत कामगारांचे नूकसान केल्याचे त्यांनी सांगितले, प्रशासनाची आर्थिक परिस्थिती नसतांनाही सन २००३, सन २००५, सन २००७, सन २०१२ या वर्षात पालिकेत कर्मचाऱ्यांची नवीन भरती प्रक्रिया केलेली आहे. या कालावधीत कोणत्याही वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्याला पदोन्नती दिलेली नाही. दरम्यान आपलेकडील जा.क्र./ भिनिशमनपा/ आस्थापना / २६२८ / २०२५. दि. १६/०९/२०२५ रोजी पदभरती संदर्भात काढलेले पत्र रद्द करावे व कार्यरत वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती द्यावी . तद्नंतर रिक्त पदावर पदभरती प्रक्रिया करावी.अन्यथा दि. ३० सप्टेंबर पासून कर्मचाऱ्यासहीत आमरण उपोषणास बसणार आहे,असे लेखी पत्र महाराष्ट्र कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे भिवंडी युनिटचे अध्यक्ष दिपक सखाराम राव यांनी भिवंडी महापालिकेचे आयुक्त अनमोल सागर यांना दिले आहे.






Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024